**पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३ विरार यांचे कार्यालय,**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.**
कार्यालयाचा पत्ता:- रिद्धी-सिद्धी अपार्टमेंट,वसई-नालासोपारा लिंक रोड, वसंतनगरी, नालासोपारा पुर्व- ४०१२०८, फोन नंबर ०२५०-२४६०००४
Email ID- dcpzone3.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.पोउआ.परि-३ विरार/पर्यटन स्थळ मनाई आदेश/२४३४/२०२२, दिनांक :- १४/०७/२०२२.**

**वाचले:- १. दिनांक १९ ऑक्टोबर २०२० रोजीची महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई यांचेकडील विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकारी प्रदान केल्याची अधिसुचना.**
**२. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२).**
**३. स.पो.आ.कार्या/विरार/जा.क्र.७२/२०२२, दिनांक ०९/०७/२०२२.**
**४. स.पो.आ./नालासोपारा जा.क्र.६५/२०२२, दिनांक १२/०७/२०२२ प्रमाणे अहवाल.**

**पर्यटन स्थळांबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मनाई आदेश :-**

---

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ विरार कार्यक्षेत्रात मान्सुन कालावधीत मोठया संख्येने पर्यटक हे निसर्गाचा तसेच धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी आनंद घेण्यासाठी येत आसतात. त्यामुळे सदर ठिकाणी पर्यटकांची जिवीतहानी व वित्तहानी होवु नये किंवा पर्यटकांचे जिवन धोक्यात येवू नये याकरीता प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे गरजेचे आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक ३ व ४ अन्वये सहा.पोलीस आयुक्त, विरार व नालासोपारा विभाग यांनी असे निदर्शनास आणुन दिले आहे की, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ विरार कार्यक्षेत्रातील अभयारण्यात/जंगलात, समुद्र किनारी मान्सुन कालावधीत मोठया प्रमाणात धबधबे वाहत असुन सदर धबधब्याकडे जाण्यायेण्याच्या वाटा अरुंद आहेत. मान्सुन कालावधीत निर्सर्गाचा तसेच पावसाचा/धबधब्याचा, समुद्र किनारी आनंद घेण्यासाठी मोठया प्रमाणात पर्यटक पालघर, ठाणे, रायगड, मुंबई इत्यादी परिसरातुन त्या ठिकाणी गर्दी करत असतात. त्यामुळे सदर ठिकाणी पर्यटकांची जिवीत व वित्त हानी होवु नये किंवा पर्यटकांचे जिवन धोक्यात येवु नये याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

त्याअर्थी, मी प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ विरार, मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालय मला प्रदान करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या क्र.पीआरओ-०९२०/प्रक्र २१७/विशा-२ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (सन १९७४ चा २) च्या कलम २१ नुसार प्राप्त विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ विरार कार्यक्षेत्रातीत विरार, पेल्हार, मांडवी, नालासोपारा व अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील सर्व धबधबे, तलाव, धरणे व इतर पर्यटनस्थळांचे १ कि.मी. परिसरात व समुद्रकिनारी दिनांक १५/०७/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक २९/०७/२०२२ रोजीचे २३.५९ वाजे पावेतो खालील बाबींकरीता प्रतिबंधात्मक आदेश लागु करीत आहे.

१. पावसामुळे वेगाने वाहना-या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे.

२. धबधब्याच्या उगमस्थानी जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे.

३. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, द-यांचे कठडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोण्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे.

४. पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्यांचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतुक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघडयावर मद्य सेवन करणे.

५. वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.

६. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतुकीस परिणाम होईल अशा प्रकारे वाहन चालविणे.

७. वाहनांची ने-आण करतांना बेदकारपणे वाहन चालवुन इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे.

८. सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्य उघडयावर इतरत्र फेकणे.

९. सार्वजनिक ठिकाणी येणा-या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांसोबत असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा त्यांचे मनास लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.

१०. सार्वजनिक ठिकाणी मोठया आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डी.जे.सिस्टीम वाजविणे गाडीमधील स्पीकर वाजवणे व त्यामुळे ध्वनी प्रदुषण करणे.

११. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदुषण होईल अशी कोणतेही कृती करणे.

जो कोणी सदर आदेशाचे भंग करेल तो इसम भारतीय दंड सहिता १८६० चे कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक जागी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंद, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ विरार कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाच्या प्रती स्थानिक वृत पत्रातुन प्रसिध्द करावा. आदेशामुळे प्रभावित होणा-या प्रत्येक व्यक्तीस आदेशापुर्वी नोटीस बाजावणे शक्य नसल्याने सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक १५/०७/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक २९/०७/२०२२ रोजीचे २३.५९ वाजे पावेतो लागु राहिल.

सदरचा आदेश आज दिनांक १४/०७/२०२२ रोजी माझे सही शिक्यानिशी दिलेला आहे.

PRASHANT VIJAYKUMAR WAGHUNDE

Digitally signed by PRASHANT VIJAYKUMAR WAGHUNDE
Date: 2022.07.14 07:19:54 -07'00'

<u>प्रत महितीस्तव सादर.</u>

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) मा.जिल्हाधिकारी, पालघर यांना माहितीस्तव सविनय सादर.
५) मा.अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय माहितीस्तव सविनय सादर.
६) उपविभागीय दंडाधिकारी, वसई यांना माहितीस्तव सादर.
७) कार्यकारी दंडाधिकारी ,वसई यांना माहितीस्तव.
८) सहा.पोलीस आयुक्त, विरार व नालासोपारा यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
९) सर्व प्रभारी अधिकारी, परिमंडळ-३ विरार यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
१०) जिल्हा माहिती अधिकारी, पालघर व ठाणे यांना वृत्तपत्रात बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी रवाना.
११) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांचेकडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
१२) नस्तीकरीता.